## अर्धा-तास चर्चेबाबत

**श्री. सुधीर मुनगंटीवार** : अध्यक्ष महाराज, आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये अर्धा-तास चर्चा दाखविण्यात आल्या आहेत. त्यात आमची एक अर्धा-तास चर्चा आहे. ती कधी घेणार आहात, याबाबत आपण सभागृहाला अवगत करावे.

**उपाध्यक्ष** : मी सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांना सांगू इच्छितो की, आपली अर्धा-तास चर्चा शनिवारी घेण्यात येईल.

**श्री. सुधीर मुनगंटीवार** : ठीक आहे.

**उपाध्यक्ष** : आता वि.स.क्र. ६ महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा (सुधारणा) विधेयक चर्चेला घेण्यात येईल.

---

## L. A. BILL No. VI OF 2011

(A Bill further to amend The Mumbai Municipal Corporation Act, The Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949, The City of Nagpur Corporation Act, 1948 and The Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965.)

**श्री. देवेंद्र फडणवीस** : अध्यक्ष महाराज, सन २०११ च्या महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगर परिषदा (सुधारणा) विधेयकाच्या संदर्भातील अध्यादेश नापसंतीचा प्रस्ताव तसेच विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचे जे प्रस्ताव सन्माननीय सदस्यांनी दिलेले आहेत. त्या सर्वांच्या वतीने मी आपल्याला सांगू इच्छितो की, ते प्रस्ताव आम्ही मांडू इच्छित नाही.

**उपाध्यक्ष** : ठीक आहे.

(अध्यादेश नापसंतीचा प्रस्ताव व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचे प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.)

**श्री. भास्कर जाधव** (नगरविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन २०११ चे वि.स.वि. क्रमांक-६, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,१९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४७ आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**श्री. देवेंद्र फडणवीस** : अध्यक्ष महाराज, मी फक्त दोन सूचना करणार आहे. या विधेयकात कॅपिटल बेस व्हॅल्यू तरतूद करण्यात आली आहे. ती चांगली तरतूद आहे. आता आपण ॲन्युएल रेंटल व्हॅल्यू करतो त्यात अडचणी आहेत. ॲम्बीक्युटी आहे. हे करत असताना सरकारने दोन गोष्टी केल्या पाहिजेत. पहिली गोष्ट म्हणजे महागनरपालिकांकडे यांचा कॉम्पीटन्स नाही त्यामुळे त्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था नगरविकास विभागाने केली पाहिजे. तसेच जे सॉफ्टवेअर आहे त्यासंबंधातील प्रशिक्षण दिले पाहिजे. तेव्हाच हे लागू करता येईल. मुंबईसाठी आपल्याला एक वर्षाची मुदत वाढ द्यावी लागली. इतर महानगरपालिकांशी नगरविकास विभागाने चर्चा करून ते कधी लागू करायचे आणि कशी कॅपॅसिटी बिल्टअप करायची आहे हे ठरवून यासंबंधातील कृती आराखडा देखील नगरविकास विभागाने आखावा. माझी तिसरा सूचना आहे. त्यासंबंधी आजच सुधारणा करावी, अशी माझी मागणी नाही. पुढे मागे करावी. मुंबईतील ५०० चौ.फुटापर्यंतच्या घरांना करवाढ लागू होणार नाही. तीच मर्यादा नागपूर मधील घरांसाठी लागू केली. नागपूर शहरामधील मधील झोपड्याचे ॲव्हरेज होल्डींग ७०० चौ.फुटाचे आहे. हे आपल्या रेकॉर्डला आहे. त्यामुळे मुंबई आणि नागपूर साठी सारखा निकष ठेवणे शक्य नाही. त्यामुळे नागपूर शहराकरिता आपण बदल करावा. नागपूर मधील परिस्थिती पाहून येत्या अधिवेशनामध्ये सुधारणा आणावी एवढीच माझी विनंती आहे.

**श्री. दीपक केसरकर** : अध्यक्ष महाराज, महानगरपालिके बरोबर नगरपालिकांना कॅपिटल बेस टॅक्स लावण्याचे प्रस्तावित केले आहे. ॲक्टमध्ये जरी or असे म्हटले असले तरी असे कम्पल्शन करण्यात येऊ नये. हा ऑप्शन महानगरपालिका किंवा नगरपालिकांना खुला ठेवावा. पाच वर्षामध्ये दुपटीपेक्षा वाढ होऊ नये अशी अपेक्षा केलेली आहे. आपण सर्वसाधारण नगरपालिकांची परिस्थिती बघितली तर एवढ्या मोठ्या प्रमाणावर अपेक्षित वाढ धरता येणार नाही. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर नाराजी दिसून येईल. दुप्पट वाढ करून तेवढा टॅक्स लोक भरू शकतील की नाही, ही मूळात शंका आहे. यासंबंधीचे स्पष्टीकरण मंत्री महोदयांनी करावे, अशी मी विनंती करतो.

**श्री. भास्कर जाधव** (नगरविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, मी सभागृहाला सांगू इच्छितो की, यासंबंधी कोणावरही जबरदस्ती नाही. हे ऐच्छिक आहे. आपला प्रॉपर्टी टॅक्स कॅपिटल व्हॅल्यू बेसवर वसूल करायचा की रेटेबल व्हॅल्यू बेसवर वसूल करायचा हे त्यांनी ठरवायचे आहे. हे ऐच्छिक आहे. हे विधेयक अत्यंत साधे, सोपे, सुटसुटीत आहे. घरामध्ये बसून कोणालाही आपला प्रॉपर्टी टॅक्स किती येईल आणि कसा येईल हे सहज कळेल अशा प्रकारचे हे विधेयक आहे. आज रेटेबल व्हॅल्यू बेसवर आधारित प्रॉपर्टी टॅक्ससंबंधी अनेक प्रकारच्या तक्रारी येतात, आक्षेप येतात. त्यामुळे या रोषाला आपल्याला सामोर जावे लागते. म्हणून सगळ्या प्रकारचा विचार करून हे विधेयक आणले आहे. यासंबंधी कोणावरही जोर जबदरस्ती नाही. ज्याला जी काही पद्धती स्वीकारावयाची असेल ती त्यांनी स्वीकारावयाची आहे. सन्माननीय सदस्यांनी मुंबई व नागपूर येथील लोकसंख्येचा आणि राहणीमानाचा फरक सांगितलेला आहे. निश्चितपणे पुढच्या काळात यासंबंधी विचार केला जाईल. लिव्ह ॲड लायसेन्सवर दिलेली जागा, स्वत: मालकी हक्काने वापरली जाणारी जागा यामध्ये लोकांना भीती वाटत होती. तो सुद्धा फरक दूर करण्यात आलेला आहे. चार-पाच वर्षांनी किती दर वाढेल किंवा नंतर कितीही वाढले तरी रेटेबल व्हॅल्यूपेक्षा कॅपिटल व्हॅल्यूबेसचे बिल चांगले आहे. याची अंमलबजावणी मुंबई महानगरपालिकेने सुरू केलेली आहे. यामध्ये लेखे करण्याकरिता काही कालावधी लागणार आहे. हा विचार करून त्यास मुदतवाढ देण्याकरिता हे विधेयक

**[ श्री. भास्कर जाधव ]**

आणलेले आहे. सभागृहाने हे विधेयक अगोदरच मंजूर केलेले असून त्याचे कायद्यामध्ये रूपांतर झालेले आहे. परंतु याची अंमलबजावणी करण्याकरिता ३१ मार्च २०१२ पर्यंत मुदतवाढ वाढविण्याकरिता हे विधेयक सभागृहासमोर आणलेले आहे. या विधेयकास सभागृहाने एकमुखाने मान्यता द्यावी, अशी माझी विनंती आहे.

**श्री. देवेंद्र फडणवीस** : अध्यक्ष महाराज, नगर विकास विभागाने इतर महानगरपालिकांच्या संदर्भात कॅपॅसिटी बिल्डींग करण्याकरिता एक कृती आराखडा तयार केलेला आहे. त्यासंदर्भात काही मॉड्युल्स असतील सॉफ्टवेअर्स असतील...

**श्री. भास्कर जाधव** : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना तपासून त्याबाबत निश्चितपणे सकारात्मक भूमिका घेतली जाईल.

**श्री. सुरेश हाळवणकर** : अध्यक्ष महाराज, या विधेयकाद्वारे बिल्डींगवर कर द्यावा लागणार आहेच परंतु रिकाम्या जागेवर देखील कर द्यावा लागणार आहे काय ?

**श्री. भास्कर जाधव** (बसून) : आपण मला दालनात येऊन भेटावे, मी आपणास माहिती देतो.

**उपाध्यक्ष** : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपाध्यक्ष** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड २ ते १७ (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

**श्री. भास्कर जाधव** : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने वि.स.वि.क्र. ६ संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपाध्यक्ष** : सन २०११ चे वि.स.वि.क्र.-६ संमत झाले आहे.

---

## नियम २९३ अन्वये वरील प्रस्तावासंदर्भात

**श्री. प्रकाश शेंडगे** : अध्यक्ष महाराज, आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आलेला नियम २९३ अन्वये वरील प्रस्ताव केव्हा घेण्यात येईल ?

**उपाध्यक्ष** : हा प्रस्ताव उद्या घेण्यात येईल.

---